बीड । गुरूवार
१७.०४.२०२५
वर्षे : ५ अंक : १७
किंमत : ३ रू. पाने : ४

# दैनिक मराठवाडा पत्र

www.marathwadapatra.com
संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 

# बीड जिल्ह्यात उद्योग क्षेत्रात होणार ९०० कोटींची गुंतवणूक : उदय सामंत



**बीड । प्रतिनिधी**

राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत बीड जिल्हा दौऱ्यावर आले असता त्यांनी बीड जिल्ह्यातील उद्योगाविषयी उदासीनता व्यक्त केली आहे. गेल्या अनेक वर्षापासून बीड जिल्ह्यात उद्योग नसल्यामुळे अनेक तरुण बेरोजगार या ठिकाणी पाहायला मिळत आहेत. त्यामुळे आता बीड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करून बीड जिल्ह्यातील तरुणांच्या हाताला काम बीड जिल्ह्यातच मिळणार असल्याची माहिती राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिली. ते पत्रकार परिषदेमध्ये बोलत होते. बीड जिल्ह्यात ९०० कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असल्याचं त्यांनी सांगितलं. येत्या तीन वर्षात सुमारे ३२ हजार तरुणांना रोजगार मिळवून देणार आहे, असं देखील मत उदय सामत यांनी व्यक्त केलं आहे. कौशल्य विकास केंद्राची स्थापना बीडमध्ये करणार आहे. यामुळे प्रशिक्षित तरुण हे बीड जिल्ह्यातच तयार होऊन बीड जिल्ह्यातच त्यांना रोजगार उपलब्ध होतील.

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांनी यासाठी निधी देखील ठेवला आहे. त्यामुळे नक्कीच बीड जिल्ह्यात उद्योग उभारणीला बळ येणार आहे.अंबाजोगाई हे कवितांचं गाव म्हणून ओळखलं जातं. पहिली कविता आद्यकवी मुकुंदराज यांनी केली होती आता आंबाजोगाई येथे एक उप विद्यापीठ उभारणी केले जाईल अशी माहितीही उदय सामंत यांनी दिली. पाच ठिकाणी पाच दालनं सुरू होणार आहेत. साहित्यिक मला भेटले, विवेकसिंधु हे पुस्तक उपलब्ध व्हावे यासाठी शासन प्रयत्न करणार आहोत.

बीड येथील एमआयडीसी करता जागा निश्चित करण्यात आली आहे. लवकरच याबाबतचे नोटिफिकेशन मिळणार आहे आहे. त्यामुळे आता बीड या सरकारच्या काळात औद्योगिक जिल्हा म्हणून ओळखला जाणार आहे तर ज्या ठिकाणी एमआयडीसीची जागा आरक्षित झालेली आहे, त्या ठिकाणी उद्योग व्यवसाय विकसित झाले नाही तर शेतकऱ्याना त्यांच्या जमिनी परत करू, असंही सामंत म्हणाले.

एकनाथ शिंदे हे आमचे मुख्य नेते आहेत. त्यांची राज ठाकरे यांच्याशी काल जी भेट झाली त्यावेळी मी देखील होतो. पण राजकीय ▶▶ उर्वरित पान २ वर

## पालकमंत्री अजित पवार यांच्या घोषणेनंतर दोन आठवड्यातंच बीड जिल्ह्यात १९१ कोटींची 'सीआयआयआयटी' स्थापनेचा निर्णय

**● 'टाटा टेक्नॉलॉजी' कडून उपमुख्यमंत्री अजित पवारांना पत्र ; ● बीड जिल्ह्यात १९१ कोटींची 'सीआयआयआयटी' स्थापन करणार ; ● पालकमंत्री अजित पवारांच्या पुढाकारामुळे बीडमध्ये १९१ कोटींची 'सीआयआयआयटी' ; ● दरवर्षी ७ हजार युवकांना मोफत प्रशिक्षण ; ● जिल्ह्यात उद्योगपुरक वातावरण करणार ; ● आ. धनंजय मुंडे यांनी मानले अजित दादांचे आभार**



**मुंबई । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील विद्यार्थी, युवकांना औद्योगिक प्रशिक्षण, तांत्रिक कौशल्यविकासाच्या माध्यमातून उद्योगक्षम बनविण्यासह रोजगार, स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्यासाठी 'सेंटर फॉर इन्व्हेंशन, इनोव्हेशन, इक्युबेशन ॲन्ड ट्रेनींग' अर्थात (सीआयआयआयटी) स्थापन करण्याची घोषणा उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित पवार यांनी केल्यानंतर अवघ्या दोन आठवड्यांच्या आतच 'टाटा टेक्नॉलॉजी' कंपनीने बीड जिल्ह्यासाठी १९१ कोटी रुपये खर्चून नवीन 'सीआयआयआयटी' स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. तशा आशयाचे पत्र कंपनीने उपमुख्यमंत्री अजित पवार यांना पाठविले आहे. नव्या सेंटरमधून दरवर्षी ७ हजार युवकांना प्रशिक्षित केले जाईल, त्यातून बीड जिल्ह्यात उद्योगपुरक वातावरण निर्माण होण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

दरम्यान बीड जिल्ह्यात नव्याने रोजगार निर्मितीची मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल माजी पालकमंत्री आ. धनंजय मुंडे यांनी अजितदादा पवार यांचे आभार मानले आहेत.

उपमुख्यमंत्री अजित पवार हे त्यांच्या निर्णयक्षम कार्यपद्धतीसाठी ओळखले जातात. धडाडीने निर्णय घेणे आणि नियोजित वेळेत यशस्वी ▶▶ उर्वरित पान २ वर

## धनंजय मुंडे आज पिंपळनेर मध्ये

### भगवानगडाच्या नारळी सप्ताहात राहणार उपस्थित

**● धनंजय मुंडे काय बोलणार याकडे सर्वांचे लक्ष**

**बीड । प्रतिनिधी**

माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे हे आज शिरूर कासार तालुक्यातील पिंपळनेर येथे भगवान गडाच्या नारळी सप्ताहाच्या काल्याच्या किर्तनप्रसंगी उपस्थित राहणार आहेत.

धनंजय मुंडे हे सकाळी ११ वाजता पिंपळनेर येथे हेलिकॉप्टर द्वारे येणार असून ते गडाच्या नारळी सप्ताहात उपस्थित राहतील. सप्ताहाचा समारोप हा गडाचे महंत न्यायाचार्य ह भ प डॉक्टर नामदेव महाराज शास्त्री यांच्या काल्याच्या कीर्तनाने होणार असून याप्रसंगी उपस्थित मान्यवरांसोबत धनंजय मुंडे हे देखील उपस्थित राहणार आहेत. दरम्यान धनंजय मुंडे हे भगवान गडाच्या नारळी सप्ताहाच्या निमित्ताने बीड जिल्ह्यात येत आहेत. आपल्या मंत्री पदाचा राजीनामा दिल्यापासून ते सार्वजनिक व्यासपीठावर बोलले नाहीत. त्यामुळे या ठिकाणी ते काय बोलणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



## अवकाळी आणि उष्णता...

### राज्यावर विचित्र हवामानाचा मारा ; नागरिकांची यातून सुटका कधी ?

**मुंबई । प्रतिनिधी**

हवामान विभागानं राज्यात पुढील २ दिवस पावसाचा अंदाज वर्तवला आहे. दक्षिणेपासून ते अगदी मध्य भारतापर्यंत सक्रिय असणाऱ्या वाऱ्यांची एकंदर दिशा पाहता राज्यात पावसासाठी पूरक वातावरणनिर्मिती होत असून, त्यामुळं सातारा,कोल्हापूर आणि पुण्यात पावसाच्या हलक्या सरी बरसण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. तर सांगली, सोलापूर, नांदेडसह इतर जिल्ह्यात मुसळधार पावसाचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. राज्याच्या कोणत्या भागांमध्ये अवकाळीचा तडाखा ? येत्या ▶▶ उर्वरित पान २ वर

## ५५ वर्षीय उपसंरपंचाकडून १६ वर्षीय मुलीवर अत्याचार, पोलिसांकडून धक्कादायक खुलासे समोर

**नांदेड । प्रतिनिधी**

राज्यात गुन्हेगारीचे सत्र दिवसेंदिवस गंभीर वळण घेत आहे. त्यातच नांदेड जिल्ह्यातून समोर आलेल्या एका विकृत घटनेने संपूर्ण परिसर हादरून गेला आहे. गावातील उपसरपंचाने अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केला आहे. त्यामुळे सर्व परिसर हदरला आहे.

उपसरपंचाचं विकृत कृत्य-गावातीलच ५५ वर्षीय उपसरपंचाने (छत्रपवशव लीळाश) केवळ १६ वर्षांच्या अल्पवयीन मुलीचे गुंगीचे औषध देत दीर्घकाळ लैंगिक शोषण केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या प्रकारातून मुलगी गर्भवती राहिली असून, तिने काही आठवड्यांपूर्वी एका चिमुरड्या



मुलीला जन्म दिला आहे.

विशेष म्हणजे, आरोपीने हे प्रकरण दडपण्यासाठी नवजात बाळाची विक्री केल्याचा गंभीर संशय पोलिसांना आहे. ही संतापजनक घटना तामसा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका गावात घडली असून, पोलिसांनी तत्काळ कारवाई करत आरोपी बाबुराव तुपेकर याला अटक केली आहे.

पीडित मुलीला मानसिक आणि शारीरिक त्रास- पोलिसांनी दिलेल्या ▶ उर्वरित पान २ वर

## ईट येथील गुगळादेवी गटाचा व समृद्धी गटाचा सन्मान सोहळा



**बीड । प्रतिनिधी**

ईट येथील गुगदेवी गट व समृद्धी गट या गटांनी फार्मर कप २०२४ या पाणी फाउंडेशन च्या स्पर्धेमध्ये भाग घेऊन आपले शेती मध्ये नवनविन प्रयोग करून आपली शेती रासायनीक मुक्त करून सेंद्रिय शेतीकडे वाटचाल करत आहे कारण पारंपारिक शेतीला फाटा देऊन सुधारित पद्धतीने शेती करण्याची गुरुकिल्ली पाणी फाउंडेशनच्या माध्यमातून शिकली ती अशी उन्हाळ्यामध्येच दशपर्णी अर्क कीड नियंत्रणासाठी बनवू लागली माती परीक्षण, उन्हात उतरायला आडवी नांगरट ,एकत्रित बियाणे खरेदी, उगवण क्षमता, बीज प्रक्रिया, बीबीएफ पेरणी यंत्र, योग्य रोपातील ओळीतील अंतर, नीमार्क फवारणी, दशपर्णी अर्क फवारणी, बायोमिक्स फवारणी ,या पाणी फाउंडेशन ने शिकवलेल्या ीची अंमलबजावणी करून आपली शेती एकट्याने नाही तर गटाने करू लागली सगळीच काम ईर्जीकने करू लागली त्यामुळे मजुराचा फायदा झाला आणि आपली कामे लवकरात लवकर आणि कमी वेळेमध्ये होऊ लागली तसेच त्यामुळे गट शेतीमध्ये

▶▶ उर्वरित पान २ वर

## अंबाजोगाई महाराष्ट्रातले तिसरे पुस्तकांचे गाव जाहीर

### उद्योग आणि मराठी भाषा मंत्री डॉ.उदय सामंत यांची घोषणा



**● आद्यकवी मुकुंदराज यांच्या नांवाने राज्यस्तरीय पुरस्कार देणार ; ● माता श्री योगेश्वरी देवी, आद्यकवी मुकुंदराज व सर्वज्ञ दासोपंत समाधी परिसर विकासासाठी पुढाकार घेणार, ● राजकिशोर मोदी यांच्या पाठपुराव्याला यश ; ● अंबाजोगाईकरांच्या वतीने केली होती निवेदनाद्वारे मागणी**

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

समस्त अंबाजोगाईकरांची बऱ्याच दिवसांपासून अपेक्षा होती की, अंबाजोगाई शहर हे पुस्तकांचे गाव जाहीर करावे. याकरिता माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी महाराष्ट्र सरकारकडे सातत्यपूर्ण पाठपुरावा केला. त्यांनी वैयक्तिकरित्या कॅबिनेट मंत्री ना.उदय सामंत यांच्याकडे व माजी मंत्री दीपक केसरकर यांच्याकडे जुलै २०२४ मध्येही पत्राद्वारे मागणी केली होती. मोदी यांच्या पाठपुराव्याला अखेर यश प्राप्त झाले असून बुधवारी बीड शहरात उद्योग आणि मराठी भाषा मंत्री डॉ.उदय सामंत हे आले असता त्यांनी अंबाजोगाई शहर तिसरे पुस्तकांचे गांव होणार, आद्यकवी मुकुंदराज यांच्या नांवाने राज्यस्तरीय पुरस्कार देणार आणि माता श्री योगेश्वरी देवी, आद्यकवी मुकुंदराज व सर्वज्ञ दासोपंत समाधी परिसर विकासासाठी पुढाकार घेणार असे जाहीर केले. यावेळी माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांच्यासह आद्यकवी मुकुंदराज ट्रस्टचे अध्यक्ष ह भ प किसन महाराज पवार, बीडच्या प्राचार्या डॉ दिपाताई क्षीरसागर, जेष्ठ साहित्यीक सतीश साळुंके, कवी साळगावकर, अतुल कुलकर्णी, संजय देवळनकर, शिवसेनेचे सचिन मुळुक, अनिल जगताप हे उपस्थित होते. याबाबत अधिक माहिती देताना माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी, मुकुंदराज संस्थानचे किसन महाराज पवार यांनी सांगितले की, अंबाजोगाई शहर हे आध्यात्मिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, साहित्य, नाट्य, क्रीडा, सहकार, ग्रंथ, परिवर्तनवादी चळवळीचे केंद्र

आहे. येथे मराठीचे आद्यकवी मुकुंदराज यांची समाधीस्थळ आहे. ग्रामदेवता माता श्री योगेश्वरी चे मंदिर आहे. त्यामुळे अंबाजोगाई ▶▶ उर्वरित पान २ वर



# पिण्याच्या पाण्याच्या भांड्यांजवळ देखील एक दिवा

पिण्याच्या पाण्याच्या भांड्यांजवळ देखील एक दिवा लावावा आणि ज्या दिवशी शक्य असेल, त्या दिवशी एक फुल देखील तेथे वाहवे आणि मनोभावे पाण्याच्या सर्व भांड्यांना हात जोडून कृतज्ञता व्यक्त करणे... वाचताना काही जणींना हे विचित्र वाटू शकेल, कोणाला हास्यास्पद वाटेल..पण मी स्वतः एक डॉक्टर आहे. विज्ञानाच्या परीक्षेतून तावून सुलाखून बघितल्या शिवाय सहसा कोणत्या गोष्टीवर विश्वास ठेवत नाही. पण सहा महिन्यांपूर्वी पाणी या विषयावर अत्यंत अभ्यासपूर्ण असे संशोधन माझ्या हाती लागले, आणि त्या नंतर चक्क काही धार्मिक पुस्तकां मध्ये त्याचे जसेच्या तसे संदर्भ देखील मिळाले..

ते सोप्यात सोप्पे करून खाली देत आहे.. नक्की वाचा..

१)पाणी...म्हणजे जीवन..पाण्याला स्वतःची विशिष्ट अशी एक स्मरणशक्ती असते.

२)पाणी पिताना ज्या प्रकारचे आपले विचार असतात, किंवा ज्या मानसिक स्थिती मध्ये आपण पाणी पितो,त्याचा प्रचंड परिणाम पाण्यावर आणि पर्यायाने आपल्यावर होतो..

३)पाण्यामध्ये बाहेरून येणाऱ्या प्रत्येक प्रकारच्या उर्जे प्रमाणे बदल होत असतात, आणि त्या बदला प्रमाणे ते तुमच्या शरीरावर परिणाम करत असते .

४)पाणी हे प्रत्येक व्यक्तीच्या शरीरावर वेगवेगळ्या प्रकारे कार्य करते. आपल्या शरीराचा जवळपास ७०-७५% भाग हा पाण्याने बनलेला आहे.म्हणजेच, शरीराचे कार्य कसे चालावे हे मुख्यत्वे आपण जे पाणी ग्रहण करतो, तेच ठरवत असते.

५)पाणी पितानाचे तुमचे विचार, पाण्याकडे बघण्याची तुमची दृष्टी किंवा नजर, पाणी पिताना आजूबाजूला येणारे आवाज, पाणी पिताना तुमच्या मनातील भावना किंवा तुमच्या तोंडातून निघणारे उच्चार या सर्वांचा पाण्यावर प्रचंड परिणाम होतो.. आणि जे प्रत्यक्षात मायक्रो स्कोप खाली बघता सुध्धा येते.

६) तुमची मानसिक स्थिती जर प्रचंड सकारात्मक असेल, आणि हातातील पाण्या विषयी जर तुम्ही प्रचंड कृतज्ञ असाल, तर गढूळ किंवा दूषित पाणी देखील तुम्हाला काहीही अपाय करू शकत नाही ; आणि तुमची मानसिक स्थिती नकारात्मक असेल, आणि पाणी पिताना जर तुम्ही पाण्या विषयी बेफिकीर असाल तर अतिशय शुध्द पाणी देखील प्रचंड अपायकारक. ठरू शकते.

७)पाणी हे जिवंत असून, मानवाची मज्जासंस्था ज्या प्रमाणे कार्य करते, त्याप्रमाणे पाणी आणि त्याची पेशिसंस्था



करू करते.

८) जे पाणी हातात धरून किंवा जवळ ठेवून प्रेमाच्या भावना मना मध्ये आणल्या जातात, त्या पाण्याच्या पेशींचा किंवा कणांचा (molecule) आकार खूपच सुंदर असतो, आणि जे पाणी हातात धरून किंवा जवळ ठेवून राग किंवा द्वेष अशा भावना मनात आणल्या जातात, त्या पाण्याच्या कणांचा आकार खूपच विचित्र आणि ओबड धोबड असतो.

९) ज्याप्रकारे पाणी पिताना तुम्ही पाण्याला ट्रीट करता, पाणी ते खूप जास्त काळापर्यंत लक्षात ठेवते आणि त्याप्रमाणे तुमच्या शरीरावर चांगले किंवा वाईट परिणाम करते.

१०) पाण्याचा विचार सध्या liquid computer म्हणून देखील केला जात असून त्यामध्ये पाण्याचा लक्षात ठेवणे(memory) हा गुणधर्म वापरला जात आहे.

११) तुम्हाला जो काही चांगला उद्देश साध्य करायचा आहे, तो उद्देश एका हातात पाण्याचा ग्लास घेऊन मग मनामध्ये बोलून मग ते पाणी पिणे या सारख्या विविध Water Therapy सध्या पाण्याच्या याच गुणधर्मांचा वापर करून उदयास येत आहेत.

१२) ही सगळी वैज्ञानिक माहिती असून, ज्यांना अजून डिटेल माहिती पाहिजे असेल, त्यांनी नेट वरून डॉ. मासारू इमोटो यांचे पाण्यावरील संशोधन शोधून वाचावे.

तर आता..या पाण्याच्या दिव्य आणि शक्तिशाली क्षमतांची सांगड आपल्या संस्कृती आणि चालिरितींशी घालण्याचा प्रयत्न केल्यावर जे काही हाती लागले, त्यावरून मी खालील गोष्टी. गेली सहा महिने करीत आहे.

१)पिण्याचे पाणी तांब्याच्या भांड्यात ठेवूनच साठवावे.. आणि शक्यतो तांब्याच्या ग्लास ने च प्यावे. कारण तांबे हा धातू ऊर्जेचा सुवाहक आहे.

२)रोज रात्री ते तांब्याचे भांडे चिंच आणि हळद वापरून धुवावे.

३)त्यानंतर त्यामध्ये स्वच्छ पाणी सुती कपड्यामधून गळून भरावे.

४) यानंतर या पाण्याच्या भांड्याच्या बाजूला एक दिवा लावून भांड्यावर एक फुल ठेवावे, आणि पाण्या विषयी मनामध्ये अत्यंत कृतज्ञतेचे भाव आणून हात जोडावेत.

(आम्हाला आयुष्य, आरोग्य आणि जीवन प्रदान केल्याबद्दल आभारी आहोत असे किंवा या प्रकारचे कोणतेही चांगले विचार मनात आणून कृतज्ञता व्यक्त करू शकता.)

५) सकाळी उठल्या नंतर याच भांड्यातील पाणी पिऊन दिवसाची सुरुवात करावी.

६)पाणी पिण्याचा सर्वात योग्य मार्ग म्हणजे दोन हातांच्या ओंजळीत घेऊन पिणे.. परंतु ते आपल्याला शक्य नसते. त्यामुळे पाणी पिताना, ज्या भांड्यामध्ये, किंवा पेल्यामध्ये प्याल, तो दोन्ही हातांनी पकडून पाणी पिणे.

७) पाणी पिताना जाणीवपूर्वक काही सेकंद पाण्याचा ग्लास दोन्ही हातात धरून मनामध्ये चांगले विचार, चांगल्या भावना आहेत याची खात्री करूनच पाणी प्यावे.

८) हीच गोष्ट कोणाच्या घरी गेल्यावर किंवा बाहेर गेल्यावर कुठले पाणी पिण्याची वेळ आली तर जाणीव पूर्वक थोडी जास्त वेळ करावी.

९)केवळ तहान लागल्यावरच पाणी प्यावे. सारखे सारखे विनाकारण पिऊ नये.

१०)आहारामध्ये पाणी जास्त प्रमाणात (८०-९०%) असलेल्या घटकांचा म्हणजेच फळांचा.. जास्तीत जास्त समावेश करावा..

या प्रकारे पाणी पिण्यामुळे आणि वर दिलेल्या सर्व गोष्टी गेले सहा महिने सलग केल्यामुळे पहिल्या दिवसा पासून झालेले फायदे.:

१) माझी लहान मुलगी, जी दर महिन्याला आजारी पडत होती, आणि तिला अँटिबायोटिक्स दर महिन्याला द्यावे लागत होते, ते पूर्ण बंद झाले.

२) माझे मानसिक आणि शारीरिक स्वास्थ्य खूप चांगले झाले, जे काही महिन्यांपूर्वी प्रचंड बिघडलेले होते.

३) माझ्या घरातील लोकांचा acidity चा त्रास जवळपास बंद झाला आहे.

४)रोज सकाळी घरातील वातावरण खूपच छान, हसते खेळते आणि ऊर्जेने भरलेले असते .

५)माझा पाण्याकडे, आणि एकूणच स्वयंपाक घराकडे बघण्याचा दृष्टीकोन प्रचंड बदलला आहे.

६)एखादे दिवशी दिवा लावायचा विसरला, तर पाण्याच्या चवीमध्ये जाणवण्या इतका फरक आहे.

( लेख डॉ गौरी यांच्या वॉलवरून)

पान १ वरून पुढे...

## बीड जिल्ह्यात उद्योग....

चर्चा झाली नाही. पूर्वीच्या घडामोडींवर चर्चा झाली, असं सामंत म्हणाले. संपलेला पक्ष उभा करण्यासाठी शिवसेना उद्धव ठाकरे प्रयत्न करत असेल, तर चांगली गोष्ट आहे. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका देखील महायुतीच्या माध्यमातून लढवल्या जाणार आहेत, असंही सामंत यांनी सांगितलं. बीड जिल्ह्यातील ज्या बँका अडवणूक करत असतील तर याविषयी मला कल्पना द्या जेणेकरून मला याची माहिती मिळेल आणि आलेला पैसा हा उद्योग उभारणीसाठी सत्कर्मी लागला पाहिजे तसंच ज्या बँका कर्ज देत नाहीत त्यांच्यावर गुन्हे दाखल केले जातील, ही भूमिकाही उदय सामंत यांनी मांडली.

## पालकमंत्री अजित पवार...

अंमलबजावणी करणे, अशी त्यांच्या कामाची पद्धत आहे. त्याचा प्रत्यय पुन्हा आला आहे. बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री म्हणून जिल्हावासियांच्या अजित पवार यांच्याकडून अनेक अपेक्षा आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार त्या अपेक्षांवर खरे उतरताना दिसत आहेत. पालकमंत्री म्हणून आजित पवार यांनी २ एप्रिल २०२५ रोजी केलेल्या बीड जिल्ह्याचा दौऱ्यात बीड जिल्ह्यातील युवकांसाठी उद्योग क्षेत्राच्या मदतीने 'सेंटर फॉर इन्व्हेंशन, इनोव्हेशन, इक्युबेशन अ‍ॅन्ड ट्रेनींग' (सीआयआयआयटी) स्थापन करण्याची घोषणा केली होती. त्याअनुषंगाने त्यांनी 'टाटा टेक्नॉलॉजी' कंपनीला पत्र लिहून सहकार्य करण्याचे आवाहन केले होते.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्राला 'टाटा टेक्नॉलॉजी' कंपनीने सकारात्मक प्रतिसाद दिला असून बीड जिल्ह्यासाठी १९१ कोटी रुपये खर्चून नवीन 'सीआयआयआयटी' स्थापन करण्याची तयारी दर्शविली आहे. १९१ कोटींपैकी १५ टक्के म्हणजे ३३ कोटी रुपयांचा खर्च बीड जिल्हा प्रशासन करणार असून उर्वरीत खर्च 'टाटा टेक्नॉलॉजी' आणि त्यांच्या भागीदार कंपन्या, संस्था उचलणार आहेत. 'टाटा टेक्नॉलॉजी' कंपनीने 'सीआयआयआयटी' स्थापन केल्यानंतर दरवर्षी सुमारे ७ हजार युवकांना उद्योगांच्या (४.०) गरजेनुसार आवश्यक जागतिक दर्जाचे औद्योगिक, तांत्रिक प्रशिक्षण दिले जाणार आहे. यामुळे उद्योगांना त्यांच्या गरजेनुसार प्रशिक्षित मनुष्यबळ मिळेल तसेच युवकांना त्यांच्या इच्छेप्रमाणे रोजगार मिळवणे, स्वयंरोजगार करणे शक्य होणार आहे.

'सीआयआयआयटी'च्या स्थापनेनंतर पहिल्या तीन वर्षांसाठी प्रशिक्षणाचा खर्च 'टाटा टेक्नॉलॉजी' उचलणार आहे. त्यानंतर प्रशिक्षणाचा खर्च 'टाटा टेक्नॉलॉजी' आणि जिल्हा प्रशासन दरवर्षी प्रत्येकी पन्नास टक्क्यांप्रमाणे विभागून उचलणार आहेत. यामुळे बीड जिल्ह्यातील हजारो युवकांना उद्योगक्षेत्राच्या गरजेप्रमाणे औद्योगिक, तांत्रिक प्रशिक्षण मिळेल. त्यांची कौशल्यवृद्धी होईल. उद्योगांना त्यांच्या गरजेप्रमाणे प्रशिक्षित मनुष्यबळ मिळेल. यातून जिल्ह्यात उद्योगपुरक वातावरण निर्माण होण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या

पान १ वरून पुढे...

या धडाकेबाज, निर्णयक्षम कार्यपद्धतीबद्दल धनंजय मुंडे यांनी आभार व्यक्त केले असून याबाबत जिल्ह्यातील नागरिकांकडून आनंद, समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

## अवकाळी आणि उष्णता...

१ ते २ दिवसात नागपूरसह विदर्भातील काही भागांमध्ये अवकाळी पावसाचा अंदाज हवामान विभागाकडून वर्तवण्यात आला आहे. ज्यामुळे शेतकऱ्यांचं आर्थिक नुकसान होण्याची शक्यता आहे. पश्चिम महाराष्ट्रातील काही भागांनासुद्धा अवकाळीचा तडाखा बसणार असल्याचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. एकिकडे अवकाळीचा तडाखा बसत असतानाच दुसरीकडे मात्र विदर्भातील कमाल तापमान मंगळवारी ४० अंशांपुढे नोंदवल्याची बाब समोर आली. अमरावती, बुलढाणा, चंद्रपूर, नागपूर, वाशिम, वर्धा आणि यवतमाळमध्ये पारा चाळीशीपार गेला. तर गोंदियात ३९.२ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. अकोला जिल्ह्यात राज्यातील सर्वाधिक तापमानाची नोंद झालीय. जिथं पारा ४३.७ अंश सेल्सिअसवर पोहोचला. त्यामागोमाग लोहगाव, जळगाव, पुणे, मालेगाव, आणि सोलापूर इथं तापमान चाळीशीपार गेल्याचं पाहायला मिळालं.

मुंबईतही उष्मा कायम... मुंबईत सलग दुसऱ्या दिवशी ३६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली असून, पुढील २४ तासांमध्ये ही स्थिती जैसे थे राहणार असल्याचा इशारा हवामान विभागानं जारी केला आहे. शहरातील या तापमानवाढीसोबत हवेत वाढलेल्या आर्द्रतेमुळे उष्मा अधिक तीव्रतेनं जाणवू लागला आहे.

देशभरातील हवामानाचा काय अंदाज ? - खासगी हवामान संस्था स्कायमेट वेदरच्या माहितीनुसार उत्तर भारतातील पर्वतीय भागांमध्ये १६ एप्रिलपासून नव्यानं एक पश्चिमी झंझावात सक्रिय आहे. याशिवाय मैदानी भागांमध्ये चक्राकार वाऱ्यांची स्थिती निर्माण होत असून या दोन्ही प्रणाली सक्रिय असल्यामुळं देशाच्या उत्तरेकडील राज्यांमध्ये धुळ, मातीचं वादळ आणि विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

## ५५ वर्षीय उपसंरपंचाकडून...

प्राथमिक माहितीनुसार, आरोपी उपसरपंचाने मागील वर्षभरापासून पीडित मुलीला मानसिक आणि शारीरिक त्रास देत तिच्यावर अत्याचार केला. सुरुवातीला गुंगीचे औषध देत तिचे शोषण सुरू करण्यात आले आणि नंतर धमकी देत हे कृत्य अनेक वेळा घडवले गेले. पीडित मुलगी गर्भवती राहिल्यानंतर गावात ही बाब उघड होऊ नये म्हणून आरोपीकडून अनेक पातळ्यांवर प्रयत्न करण्यात आलेअखेर, पीडितेची प्रसूती नांदेड येथील शासकीय रुग्णालयात झाली. तिने एका मुलीला जन्म दिला. मात्र, त्यानंतर बाळाला कुठे ठेवले गेले याचा ठोस तपशील मिळत नसल्याने बाळाची विक्री झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. पोलीस या प्रकरणाचा सखोल तपास करत आहेत. दरम्यान,आरोपी उपसरपंच बाबुराव तुपेकर याला नांदेड पोलिसांनी तात्काळ अटक केली असून

पान १ वरून पुढे...

त्याच्यावर पोक्सो अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे. आरोपीला कठोर शिक्षा व्हावी आणि पीडितेला न्याय मिळावा, अशी जोरदार मागणी स्थानिक नागरिकांकडून आणि महिला संघटनांकडून होत आहे.

## ईट येथील गुगळादेवी...

आनंद मिळू लागला सामाजिक कार्य गट शेतीच्या माध्यमातून करू लागली तसेच प्रगतशील शेतकऱ्यांच्या भेटीगाठी कृषी प्रदर्शने पाहण्यासाठी गटाने एकत्र येऊ लागली विद्यापीठाने तयार केलेल्या डिजिटल शेती शाळा मध्ये गटाने शेतकरी सामील होऊ लागली त्यामुळे येणाऱ्या अडचणीवर मात करत शास्त्रज्ञाला संवाद साधू लागली त्यामुळे गट शेती वाढू लागली शेतीमुळे विद्यापीठे तसेच कृषी ऑफिस कृषी विज्ञान केंद्र यांच्या माध्यमातून गटाचा विकास होऊ लागला बीड तालुक्यातील प्रथम बक्षीस समृद्धी महिला शेतकरी गट ईट यांना तर द्वितीय क्रमांकाचे बक्षीस गुगळादेवी शेतकरी गट ईट यांना बालेवाडी स्टेडियम येथे मुख्यमंत्री व कृषिमंत्री यांच्या हस्ते मिळाले त्याच अनुषंगाने आज बीड येथे छत्रपती संभाजीनगर चे विभागीय कृषी संचालक श्री देशमुख साहेब यांच्या हस्ते व जिल्हा कृषी अधिकारी मा, श्री सुभाष साळवे साहेब यांच्या हस्ते तसेच पूर्ण कृषी ऑफिस ची टीम व पाणी फाउंडेशन चे विभागीय समन्वयक संतोष शिंगारे सर तालुका समन्वयक मेदने सर व मास्टर ट्रेनर ठोंबरे सर विशाल सर व विशाल घोलप सर हे उपस्थित होते टीमच्या समवेत दोन्ही गटाचा सन्मान करण्यात आला त्यावेळी गुगळा देवी शेतकरी गटाचे अध्यक्ष रामप्रसाद अशोक डोईफोडे व गटातील सदस्य तसेच समृद्धी महिला शेतकरी गटाचे अध्यक्ष मंगल रामप्रसाद डोईफोडे व त्यांचे सर्व सदस्य यावेळी उपस्थित होते.

## अंबाजोगाई महाराष्ट्रातले...

शहर हे पर्यटनदृष्ट्या सक्षम असून लेखक, साहित्यिक व वाचन प्रेमी वर्ग या शहरात मोठ्या प्रमाणात दिसून येतात. वाचन संस्कृतीला बळ देणारे असे विविध उपक्रम वर्षभर अंबाजोगाईमध्ये राबविले जातात.

अंबाजोगाई ही मराठी भाषेचे आद्य कवी मुकुंदराज, प्रकांड पंडित सर्वज्ञ दासोपंत यांची कर्मभूमी आहे. तसेच कोकणस्थांची कुलदेवता माता योगेश्वरी देवी यांच्या पदस्पर्शाने पावन झालेलं गाव आहे. नैसर्गिक विविधतेने नटलेले गांव आहे. नदी, डोंगर, वनराई, पशु पक्षी यासोबतच मंदिराचे गांव म्हणून अंबाजोगाईची ओळख आहे. मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या लढ्याचे नेतृत्व ज्यांनी केले ते स्वामी रामानंद तीर्थ यांच्या लोककार्याची साक्ष देणारे हे गांव आहे. दिवंगत नेते प्रमोदजी महाजन, दिवंगत नेते गोपीनाथराव मुंडे, माजी खासदार बापूसाहेब काळदाते, माजी आमदार बाबुरावजी आडसकर, डॉ.द्वारकादास लोहिया, भगवानराव लोमटे बापू, डॉ.व्यंकटराव डावळे, रामकाका मुकादम यांच्यासह अनेक मान्यवरांनी विविध क्षेत्रात अंबाजोगाईचा लौकिक सर्वदूर केला आहे. ज्येष्ठ साहित्यिक रंगनाथ तिवारी, अमर हबीब, स्व.शैलाताई लोहिया, डॉ.नागरगोजे, दिनकर जोशी, दगडू लोमटे, बालाजी सुतार, मुकूंद राजपंखे, प्राचार्य डॉ कमलाकर कांबळे,प्रा

पान ४ वरून पुढे...

किरण कांबळे, प्रा.गौतम गायकवाड, बलभीम तरकसे, विश्वांभर वराट गुरूजी, स्व.प्रा.संभाजी सावळकर यांनी अंबाजोगाई साहित्य संमेलन चळवळीला बळ दिले आहे.

अंबाजोगाई शहरात बालझुंब्बड' सारखा उपक्रम मागील अनेक वर्षांपासून सातत्याने सुरू आहे. 'बालझुंब्बड' मुळे नव्या पिढीला एक सशक्त व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. 'बालझुंब्बड' ने हजारो विद्यार्थी घडविले आहेत. हे विशेष होय. अशा वैविध्यपूर्ण बाबींमुळे अंबाजोगाई शहर तिसरे पुस्तकांचे गाव समस्त अंबाजोगाईकरांच्या मागणीला मिळालेलं हे सर्वांत मोठं यश असून ही आपल्या सर्वांसाठीच आनंदाची बाब आहे. अंबाजोगाई शहर तिसरे पुस्तकांचे गांव होणार, आद्यकवी मुकुंदराज यांच्या नांवाने राज्यस्तरीय पुरस्कार देणार आणि माता श्री योगेश्वरी देवी, आद्यकवी मुकुंदराज व सर्वज्ञ दासोपंत समाधी परिसर विकासासाठी पुढाकार घेणार असे उद्योग आणि मराठी भाषा मंत्री डॉ.उदय सामंत बीड येथे बुधवार, दिनांक १६ एप्रिल रोजी जाहीर केल्याचे राजकिशोर मोदी यांनी यावेळी सांगितले. त्याचबरोबर मुकुंदराज समाधी परिसर हे पर्यटन क्षेत्र म्हणून विकसित करावे व यासाठी वन विभागाकडील पाच एक्कर जागा ही मुकुंदराज संस्थानला उपलब्ध करून देण्याच्या मागणीवर देखील वनमंत्री ना गणेश नाईक यांनी प्रत्यक्ष भेट घेऊन यावर देखील सकारात्मक निर्णय घेण्याचा शब्द ना. उदय सामंत यांनी याप्रसंगी दिल्याचे राजकिशोर मोदी यांनी नमूद केले. त्याचबरोबर विवेकसिंधु हा ग्रंथ महाराष्ट्र शासनाच्या वतीने प्रसिद्ध करून तो ग्रंथ राज्यातील प्रत्येक वाचनालयात ठेवण्याची मागणी जेष्ठ साहित्यिक साळेगावकर यांनी यावेळी केली व ती मागणी देखील उदय सामंत यांनी तात्काळ मान्य केल्याचे मोदी यांनी सांगितले. अंबाजोगाई करांच्या या सर्व मागण्यांची पूर्तता केल्याबद्दल महाराष्ट्राचे सन्माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उद्योग आणि मराठी भाषा मंत्री डॉ.उदय सामंत, माजी मंत्री दीपक केसरकर व माजी मंत्री धनंजय मुंडे यांचे राजकिशोर मोदी व मुकुंदराज संस्थानचे किसन महाराज पवार यांनी समस्त अंबाजोगाईकरांच्या वतीने आभार व्यक्त केले आहेत.

## बलभीम नगर...

सचिन वाघमारे, राधाताई साळवे, अंजली तेजस वडमारे, अंजली वडमारे, सरिता खेमाडे, सुजाता वाघमारे, कोमल वाघमारे, आचल वडमारे, प्रीती जाधव, आरोही अंकुटे, अदिती धनवे, सांची वडमारे, जानवी वाघमारे, पंचफुला वाघमारे, वर्षा खेमाडे, शालन धनवे, उर्मिला वडमारे, जयश्री वडमारे, स्वाती वडमारे, सोनाली अंकुटे, सुशीला साळवे, हेमा वडमारे, रमा सोनवणे, दिपाली जाधव, जयश्री गवळी, अर्चना जाधव विशाल वडमारे, राजू धनवे, सचिन खेमाडे, नितीन वाघमारे, शिला साळवे, राणी साळवे, अनन्या वाघमारे, संगीता जाधव, रोहन जाधव, आदित्य खेमाडे, भाऊसाहेब भोसले, दिलीप गवळी, प्रकाश शेंडगे, लक्ष्मण भंडारे.व शिवाजीनगर, बलभीम नगर, दिलीप नगर,मित्र नगर परिसरातील सर्व उपासक उपासिका, बालक बालिका उपस्थित होते.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

CMYK



# शेतकऱ्यांनी खोडवा जाळताना बांधावरील झाडे होरपळून जाताहेत

## वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे संत तुकारामांच्या अभंगाचा विसर पडलाय : डॉ.गणेश ढवळे






**लिंबागणेश । प्रतिनिधी**

दरवर्षी रब्बी हंगामातील ज्वारीचे, गव्हाचे पिक निघाल्यानंतर शेतीची मशागत सुरू होते.यादरम्यान शेतकरी आपल्या शेतात खत टाकणे,नांगरणी करणे आदी कामे करतात.यादरम्यान ज्वारी ,गव्हाचा खोडवा नष्ट करण्यासाठी शेताच्या कडेला असलेल्या ताली पेटवुन देतात. रस्त्यालगत असणाऱ्या शेतजमीन मालकांकडून लावलेल्या आगीत झाडे होरपळून निघतात.झाडांची मोठी हानी होते. झाडे लावा,झाडे जगवापाणी अडवा पाणी जिरवा अशा आपण दिलेल्या घोषणा हवेतच विरतात.त्याची अंमलबजावणी किती प्रमाणात होते याचा विचार केला जात नाही.ग्रामीण भागातील शेतकरी पिकांना वसवा नको म्हणून बांधावरील झाडे तोडतात. उष्णतेचा दाह वाढल्याने हवामान आणि पृथ्वीच्या तापमानावर दुष्परिणाम होतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी खोडवा जाळताना बांधावरील झाडांना ईजा होणार नाही याची काळजी घ्यावी असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबा गणेश कर यांनी केले आहे. वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे या वृक्षसंपदेचे,वनसंपदेचे महत्व पटवुन देणा-या जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या अभंगाचा आपल्याला विसर पडला असुन तो अंगिकारला तरच पुढील पिढ्या सुखाने आनंदाने जगतील. माणसाला सुसह्यपणे जगण्यासाठी म ोठ्या प्रमाणात झाडांची लागवड करणे गरजेचे आहे.पुर्वी रस्त्याच्या बाजूला वडाची,पिंपळाची,लिंबाची मोठम ोठाली झाडं असायची. त्यामुळे रस्त्याने जाताना थंडावा जाणवायचा . मात्र आता रस्ता रुंदीकरणाच्या नावाखाली अनेक मोठमोठाल्या वृक्षांची कत्तल करण्यात आली आहे. तोडण्यात आलेली झाडे पुन्हा लावण्यात येत नाहीत.

# महावीर-भगवान स्वामी चा जन्मकल्याण उत्सव निमित्त धार्मिक कार्यक्रम व अन्नदान

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील फुलाईनगर, कृष्ण मंदिर जवळ पवनपुत्र निवास येथे समाजसेविका सीमा ओस्तवाल, मनोज ओस्तवाल, वीरेंद्र ओस्तवाल यांनी महावीर भगवान स्वामी चा जन्मकल्याण उत्सव निमित्त रामायणतील सुंदरकांड चे पारायण व म हाप्रसादाचे आयोजन केले होते. गुरु आनंद महिला प्रतिष्ठानच्या परिवाराच्या वतीने गेल्या अनेक वर्षापासून बीड शहरातील विविध छोट्या मोठ्या वस्त्यावरील, विविध जाती धर्मातील गोरगरीब गरजूंसाठी अन्नदानाचा उपक्रम राबवण्यात आला.



भगवान महावीर जन्म कल्याण उत्सवात विविध कार्यक्रम घेण्यात आले. बीड शहरातील समाजसेविका गुरु आनंद महिला प्रतिष्ठानचे अध्यक्ष सौ.सीमा ओस्तवाल यांच्याकडून जैन समाजाचे २४ वे तीर्थकार भगवान महावीर स्वामीचा जन्म कल्याण साजरा करण्यात आला. बीड शहरातील वेगवेगळ्या भागात जाऊन तिथल्या गोरगरीब लोकांना एक वेळचं जेवण देऊन भगवान महावीर स्वामी चा जन्म कल्याण साजरा करण्यात आला. यावेळी पेठ बीड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अशोक मोद्दीराज साहेब, पत्रकार आननाद खान, विजय पोकळे, जिव्हाळा बेघर चे राजू वंजारे, अभिजीत वैद्य,छाया सरोदे, सुजाता सावंत, सविता जैन, ऍड. अश्विनी शिंदे, सुरेखा झिंगे अनिता वाघमारे, गणेश झिंगे, यांच्यासह असंख्य गुरु आनंद महिला प्रतिष्ठानच्या परिवारातील सदस्यांची उपस्थिती होती.

# गेवराई बस स्थानक एक आदर्श व सुंदर स्वच्छ ते साठी विविध स्तुत्य उपक्रम राबविणे- अनिल बोर्डे

**गेवराई । प्रतिनिधी**

बस स्थानकात प्रवास करताना प्रवाशांना अनेक अडचणींना साम ना करावा लागत आहे . निवेदनाद्वारे विविध मागणी नमूद केले आहेत त्यापैकी काही मागण्या तात्काळ आश्वासन देऊन सकारात्मकता दर्शविली. या संदर्भात गेवराईतील आगार कार्यालयात बीड येथील विभाग नियंत्रण माननीय अनुजा दुसाले यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. याप्रसंगी त्यांच्यासोबत विभाग वाहतूक अधिकारी राजकुमार दिगटे. शिवराज कराड इत्यादी उपस्थित होते. तसेच गेवराई येथील आगार प्रमुख श्री म्हस्के उपस्थित होते सदरील निवेदन गेवराई ग्राहक पंचायत मार्गदर्शक केंद्रप्रमुख तथा



बीड जिल्हा ग्राहक पंचायत उप जिल्हाध्यक्ष तसेच श्री जगदंबा ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संस्था अध्यक्ष अनिल बोर्डे आणि गेवराई ग्रामपंचायत तालुका अध्यक्ष प्रा. फलके भानुदास इत्यादी उपस्थित होते. सदरील निवेदन वाचल्या नंतर त्यातील काही मागण्या त्यांनी तात्काळ सोडविल्या जातील अशा प्रकारचे सकारात्मक आश्वासन त्याच क्षणी देण्यात आली त्यामुळे बीड येथील विभाग नियंत्रण माननीय अनुजा दुसाले यांचे अभिनंदन व कौतुक केले अशा प्रकारची अधिकार सर्व कार्यालया असतील तर सर्व कार्यालय गरुडछेप घेतील . याप्रसंगी याप्रसंगी त्यांनी नाशिक बस तात्काळ सुरू केली जाईल असे स्पष्ट सांगितले. याचबरोबर पोलीस चौकीच्या संदर्भात ही पण मागणी त्यांनी तात्काळ सुरू करण्यात येईल असे सांगितले. कारण की पोलीस चौकी असणे हे खूप महत्त्वाचे आहे असे त्यांनी स्वतः सांगितले व बस आगारा मार्फत राबविण्यात येणाऱ्या यूपी आय पेमेंटच्या माध्यमातून व्यवहार करणे हे पण त्यांनी गरजेचे आहे.

# बदलत्या जीवनशैलीमुळे किशोरवयीन मुलींमध्ये पीसीओएस विकार वेगाने वाढतोय: डॉ. पूजा माने

## आदित्य शिक्षण संस्थेत जागतिक आरोग्य दिनानिमित्त पीसीओएस आणि पीसीओडीच्या पॅथोफिजियोलॉजी विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन





**बीड । प्रतिनिधी**

जागतिक आरोग्य दिनानिमित्त बीड शहरातील आदित्य शिक्षण संस्थेत पीसीओएस आणि पीसीओडीच्या पॅथोफिजियोलॉजी या विषयावर निरोगी सुरुवात, आशादायक भविष्य या संदर्भात डॉ. पूजा माने-जाधव, (एमबीबीएस, डीजीओ) यांचे अतिथी व्याख्यान संपन्न झाले. त्यांनी बदलत्या जीवनशैलीमुळे किशोरवयीन मुलींमध्ये पीसीओएस विकार वेगाने वाढत असल्याचे कारण सांगितले. यावेळी आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाला आदित्य शिक्षण संस्थेतील आयुर्वेद, नर्सिंग, दंत, कृषी, कृषी अभियांत्रिकी अन्न तंत्र जैवतंत्र, फार्मसी फिजिओथेरपी महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे उदघाटकन आदित्य आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले. दर्जेदार शिक्षणाबरोबर विद्यार्थ्यांच्या आरोग्याचीही काळजी आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा हे सातत्याने घेत आहेत. शिक्षण, आरोग्य आणि क्रीडा क्षेत्रात आदित्य शिक्षण संस्थेचे विद्यार्थी नेहमीच टॉपवर आहेत. त्याचाच एक भाग म्हणून आदित्य शिक्षण संस्थेच्या वतीने विद्यार्थ्यांना आरोग्य विषयी सखोल माहिती मिळावी यासाठी - डॉ. पूजा माने यांचे व्याख्याने ठेवले होते. यावेळी मार्गदर्शन करतांना डॉ. पुजा माने म्हणाल्या की, आजच्या धावपळीच्या आणि बदलत्या जीवन शैलीच्या युगात किशोरवयीन मुलींमध्ये पीसीओएस (पॉलिसिस्टिक ओव्हेरियन सिंड्रोम) हा विकार वेगाने वाढताना दिसत आहे. हार्मोनल असंतुलनामुळे निर्माण होणाऱ्या या समस्येमुळे मासिक पाळीच्या तक्रारी, वजनवाढ, केस गळणे, चेहऱ्यावर केस येणे तसेच भविष्यात गर्भधारणेतील अडचणी अशा अनेक त्रासदायक लक्षणांचा सामना मुलींना करावा लागतो.

# आनंदऋषीजी हॉस्पिटल मध्ये रविवार दि २० एप्रिल रोजी ११ ते २ आस्थीरोग तपासणी

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रसंत आनंदऋषीजी म हाराज यांच्या कृपा आशीर्वादाने व संत आदर्श ऋषीजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली जैन सोशल फेडरेशन अहमदनगर संचलित, बीड येथील जालना रोड, शाहु बँकेजवळ असलेले आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे रविवार दि २० एप्रिल रोजी ११ ते २ या वेळेत आस्थीरोग तपासणी तसेच मनके व सांधे बदली, गुडघे दुखी, पाठ दुखी, कंबर दुखी तपासणी व शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. वैद्यकीय सेवा दिवसेंदिवस महाग होत असल्याने बीड जिल्ह्यातील सर्वसामान्य रुग्णांना कमीत कमी पैशात सेवा उपलब्ध व्हावी या उदात्त हेतुने शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. तरी अस्थिरोग असणार्या रुग्णांनी या सेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन सकल जैन समाज बीडच्यावतीने करण्यात आले आहे. रविवार दि २० एप्रिल रोजी ११ ते २ या वेळेत, अहमदनगर येथील तज्ञ डॉ. रोहन धोत्रे व त्यांचे सहकारी डॉक्टर रुग्णांची तपासणी करणार आहेत. संत आनंदऋषीजी महाराज यांच्या प्रेरणेने गेल्या २० वर्षापासून हॉस्पिटल कार्यरत आहे.


## जाहीर प्रगटन

**मा. श्री. एम. आय. एस. दर्यावर्दी, ७ वे दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बीड, ता. जि. बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ६४०/२०२५**

**ॲड. बी. एस. जाजु यांचे मार्फत , विठ्ठल व ईतर वि. निरंक**

ज्याअर्थी उत्तम दादा मुळे, हे दिनांक ०४.०२.२०२५ रोजी बीड ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत त्याअर्थी,

१. विठ्ठल पि. उत्तम मुळे, वय- ५२ वर्षे, धंदा शेती रा. वाढवणा, पो. पिंपळगांव घाट, ता. जि. बीड, २. हिराबाई अरुण गायकवाड, वय ७२ वर्षे, धंदा घरकाम रा. जातेगांव ता. जामखेड जि. अहमदनगर, (अहिल्यानगर ), ३. मिरा भ्र. बन्सी जाधव, वय ५० वर्षे, धंदा- घरकाम रा. चौसाळा, ता. जि. बीड

अर्जदार क्र. १ हा मयताचा मुलगा असुन अर्जदार क्र. २ व ३ हया मयताच्या विवाहीत मुली आहेत. असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदारांच्या हकाबद्दल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा/ अर्जदारांचा एक शाबीत दिसल्यास त्यांना / अर्जदारांना सदरहु मयत यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**प्रकरणाची पुढील तारीख ०९.०६.२०२५ ही आहे.**

आज दिनांक ११.०४. २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**आदेशावरून.**

**(स्वाक्षरीत)** **अधीक्षक** **दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**

**(स्वाक्षरीत)** **क.लिपीक**

शिक्का



**कार्यालय, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड**

**घर नंबर १-४-१६००, उत्तमनंदा बिल्डींग, पहिला मजला,**

**अंबिका चौक, पांगरी रोड, शाहु नगर, बीड ता. जि. बीड पिन ४३११२२**

## जाहिर प्रगटन

**जावक क्र. ४४२** **दिनांक - ०९/०४/२०२५**

**तक्रार क्रमांक : - ६५७/२०२४**

अर्जदारः- १. ॲड. अजित मुरलीधर देशमुख, २. सौ. सुनिता अजित देशमुख, ३ . महेश अजित देशमुख, ४. मनोज अजित देशमुख, ५. सोनाली अजित देशमुख.

विरुध्द

अर्जदार :- १. जिजाउ मॉसाहेब मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि. बीड, मुख्य कार्यालय, जिजाउ पुताळयासमोर, राजीव गांधी चौक, कॅनॉल रोड, बीड, ता. जि. बीड. मार्फत - शाखा व्यवस्थापक, अश्विनी सुनिल वांढरे, व्यवस्थापक.

२. सौ. अनिला बबन शिंदे, अध्यक्षा, जिजाउ मॉंसाहेब मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि. बीड मुख्य कार्यालय, जिजाउ पुताळयासमोर, राजीव गांधी चौक, कॅनॉल रोड, बीड, ता. जि. बीड.

३ . सौ. शोभा सखाराम खरसाडे, उपाध्यक्ष, जिजाउ मॉसाहेब मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि. बीड मुख्य कार्यालय, जिजाउ पुताळयासमोर, राजीव गांधी चौक, कॅनॉल रोड, बीड, ता. जि. बीड.

४. गणेश दत्तोबा रसाळ, संचालक, जिजाउ मॉसाहेब मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि. बीड मुख्य कार्यालय, जिजाउ पुताळयासमोर, राजीव गांधी चौक, कॅनॉल रोड, बीड, ता. जि. बीड.

५ . भारत हरिदास सावंत, संचालक जिजाउ मॉसाहेब मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि. बीड मुख्य कार्यालय, जिजाउ पुताळयासमोर, राजीव गांधी चौक, कॅनॉल रोड, बीड, ता. जि. बीड.

६ . बाळासाहेब भास्कर हाडुळे, संचालक, जिजाउ मॉसाहेब मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि. बीड मुख्य कार्यालय, जिजाउ पुताळयासमोर, राजीव गांधी चौक, कॅनॉल रोड, बीड, ता. जि. बीड.

७. सौ . सुलभा नितीन कापसे, संचालिका, जिजाउ मॉसाहेब मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि. बीड मुख्य कार्यालय, जिजाउ पुताळयासमोर, राजीव गांधी चौक, कॅनॉल रोड, बीड, ता. जि. बीड.

८. सौ . वनिता अण्णासाहेब पायाळ, संचालिका, जिजाउ मॉंसाहेब मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडी सोसायटी लि. बीड मुख्य कार्यालय, जिजाउ पुताळयासमोर, राजीव गांधी चौक, कॅनॉल रोड, बीड, ता. जि. बीड.

९. रामभाउ दामू कांबळे, संचालक, जिजाउ मॉंसाहेब मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि. बीड मुख्य कार्यालय, जिजाउ पुताळयासमोर, राजीव गांधी चौक, कॅनॉल रोड, बीड, ता. जि. बीड.

१०. सौ. उषा सोजाजीराव गव्हाणेश् संचालिका, जिजाउ मॉसाहेब मल्टीस्टेट को- ऑप. क्रेडीट सोसायटी लि. बीड मुख्य कार्यालय, जिजाउ पुताळयासमोर, राजीव गांधी चौक, कॅनॉल रोड, बीड, ता. जि. बीड.

११. सुदाम रूस्तुम काळे, संचालक, जिजाउ मॉसाहेब मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि. बीड मुख्य कार्यालय, जिजाउ पुताळयासमोर, राजीव गांधी चौक, कॅनॉल रोड, बीड, ता. जि. बीड.

१२. आशा रंगनाथ शिंदे, संचालक, जिजाउ मॉंसाहेब मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि. बीड मुख्य कार्यालय, जिजाउ पुताळयासमोर, राजीव गांधी चौक, कॅनॉल रोड, बीड, ता. जि. बीड.

वर नमुद तक्रारदार यांना विरुध्द पक्ष यांच्या विरुध्द ग्राहक संरक्षण कायद्यान्वये वर नमुद तक्रार दाखल केलेली आहे. यातील विरुध्द पक्ष यांना नोटीस पाठविली असता ते स्विकारत नाही / पत्ता बदल झालयामुळे मिळुन येत नाही. म्हणून तक्रारदारांनी केलेल्या विनंतीनुसार या जाहिर नोटीस व्दारे आपणास कळविण्यात येते की, विरुध्द पक्ष यांनी वर नमुद या आयोगाच्या पत्यावर दिनांक २८/०५/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वता. अगर वकिल किंवा प्राधिकृत प्रतिनिधि मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जबाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत. जर विरुध्द पक्षांनी याकामी कसूर केल्यास मा. आयोगाव्दारे एकतर्फा आदेश पारित करणेत येवुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची दखल घ्यावी.

मा. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड यांची आदेशानुसार.

दिनांक - ०८/०४/२०२५

ठिकाण - बीड

शिक्का

**(स्वाक्षरीत)** **प्रबंधक** **जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड**


CMYK

दैनिक
● epaper.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

गुरूवार, दि.१७ एप्रील २०२५ पान ४

# इडीच्या विरोधात बीड जिल्हा काँग्रेसची निदर्शने

**बीड । प्रतिनिधी**

नॅशनल हेरॉल्ड प्रकरणात काँग्रेस पक्षाच्या नेत्या मा. सोनियाजी गांधी व राहुलजी गांधी यांच्या विरोधात चुकीचे चार्जशीट दाखल करत जाणीवपुर्वक गांधी व काँग्रेस परिवाराच्या विरोधात ई डी ला पुढे करुन भारतीय जनता पार्टीचे हे जुलमी सरकार षडयंत्र रचत असुन या विरोधात आज जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांच्या नेतृत्वात बीड जिल्हाधिकरी कार्यालयासमोर निदर्शने करत जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांना निवेदन देण्यात आले.




यावेळी जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, प्रदेश सरचिटणीस अमर खानापुरे, गणेश बजगुडे, श्रीनिवास बेदरे, बाळासाहेब ठोंबरे, गणेश राउत, परवेज कुरेशी, महेश बेदरे, मोहसीन शेख, आकाश मस्के, आशिष सोनवणे, सफदार देशमुख, विष्णु मस्के, अमोल पाठक, रामधन जमाले, हनुमान घोडके, ॲड. विलास मस्के, नितीन जयभय, गणेश जवकर, कादर बाबामिया, शेख जहीर, शेख जमील, शेख खमरोद्दीन आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## शांताई अर्बन मध्ये भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

**बीड । प्रतिनिधी**

सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या शांताई अर्बन मध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती बीड येथे येथील सुप्रसिद्ध डॉ. बालाजी नवले सर , डॉ. प्रकाश फड सर ,न्यू लाइफ हॉस्पिटल आणि ग्रामसेवक श्रीराम वीर सर,ग्रामसेवक राहूल वीर सर यांच्या हस्ते करण्यात आली

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे न्याय शास्त्रज्ञ अर्थशास्त्रज्ञ राजकारणी आणि तत्त्वज्ञ आणि समाज सुधारक होते त्यांनी दलित बौद्ध चळवळीला प्रेरणा दिली, सामाजिक भेदभाव नष्ट करण्यासाठी त्यांनी चळवळ उभारली असे मत डॉ. बालाजी




नवले सर यांनी मांडले

महिला आणि कामगाराच्या हक्काचे त्यांनी समर्थन केले तसेच ते भारताचे पहिले कायदे मंत्री होते भारतीय संविधानाचे ते शिल्पकार होते अशा या आधुनिक भारताच्या शिल्पकाराला शतशः नमन असे मत डॉ.डी.बी शिंदे सर यांनी मांडले

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष डॉ. शिंदे सर आणि उपाध्यक्ष श्री.संदीप वाघमारे सर तसेच शांताई अर्बन चे कर्मचारी व पिग्मी एजंट तसेच खातेदार उपस्थित होते. परत सर्वांनी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार परम पूज्य विश्वरत्न महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्त विनम्र अभिवादन कार्यक्रम संपन्न झाला .

## ग.दी. कुलथे यांना आदरांजली



**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाचे संस्थापक तथा मुख्य मार्गदर्शक कै. ग.दि. कुल्थे यांचे शनिवार दिनांक १४ फेब्रुवारी रोजी रात्री दुःखद निधन झाले. बीड जिल्हा राजपत्रित अधिकारी महासंघ परिवाराच्या वतीने निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांचे दालनात आदरांजली अर्पण करून दोन मिनिटे स्तब्धता पाळून त्यांच्या आत्म्यास चिरंशांती मिळो अशी प्रार्थना करण्यात आली.

या प्रसंगी निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, जि. प. चे कॅफो केंद्रे महासंघाचे राज्य संघटक प्रल्हाद जावळे, कोषागार अधिकारी गळगुंडे, अप्पर कोषागार अधिकारी महेश बाब्रस, जिल्हा ग्राहक आयोगाचे प्रबंधक नितीन जोशी,लेखाधिकारी श्रीकांत कुलकर्णी,राहुल धोंगडे मोठ्या संख्येने राजपत्रित अधिकारी उपस्थित होते.

## केज येथे कृषी विद्यालय सुरू करा ; मराठवाडा जनता विकास परिषदेची मागणी

**केज । प्रतिनिधी**

केज शहरालगत असलेल्या फलोत्पादन च्या जागेत अतिक्रमण मोठ्या प्रमाणात वाढत आहे. याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष आहे. ग्राम ीण भागातील विद्यार्थ्यांना केज शहरात कृषी विद्यालयाची गरज आहे. ग्रामीण भागात शेती हा मुख्य व्यवसाय आहे. कृषी शिक्षणानंतर आधुनिक तंत्रज्ञान शेतीसाठी या शिक्षितांचा उपयोग शेतीसाठी होणार आहे. खेडेगावातील विद्यार्थ्यांसाठी कृषी विद्यालय अत्यावश्यक आहे फलोत्पादनच्या जागेत कृषी विद्यालय सुरू करण्यात यावे अशी मागणी मराठवाडा जनता विकास परिषद केज शाखेच्या वतीने करण्यात आली.केज तहसीलदार यांच्यामार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन देण्यात आले आहे.

## बलभीम नगर बुद्ध विहार येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी



**बीड । प्रतिनिधी**

शिवाजीनगर येथे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्त शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक व नगरसेवक विनोद मुळूक, संदीप उबाळे यांच्या उपस्थितीत महामानवास अभिवादन करून उत्साहात जयंती संपन्न विशेष आकर्षण बलभीम नगर लेझिम पथकाने सर्वांचे मन जिंकले. त्यावेळी ॲड तेजस वडमारे, सिद्धार्थ वडमारे, नागेश साळवे, आर्यन साळवे गौतम खेमाडे,

▶▶ उर्वरित पान २ वर

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक उत्सव समितीच्या वतीने सौ.सीमा ओस्तवाल सन्मानित

**बीड । प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती बीड शहर आयोजित जयभिम महोत्सव मध्ये व्याख्यान मालेचे चौथे पुष्प गुंपण्यासाठी धम्मसंघनी रमागोरख नागपूर यांच्या व्याख्यानचे आयोजन सामाजिक न्याय भवन, बीड येथे करण्यात आले होते.

या प्रसंगी प्रमुख पाहुण्या म्हूणन गुरु महिला आनंद प्रतिष्ठान च्या अध्यक्षा सौ. सिमा ओस्तवाल मॅडम यांना आमंत्रित करण्यात आले होते.

जि.प. विद्यार्थी यांना दरवर्षी मोफत वह्या- पेन वाटप, तसेच दिवाळी,रमजान च्या निमित्ताने गरजू लोकांना




मोफत किराणा वाटप करत असतात. विद्यार्थी प्रिय सम ाज सेविका म्हणून आपल्या कार्यामुळे ओस्तवाल मॅडम सर्व परिचित आहेत. त्यांच्या या सामाजिक शैक्षणिक कार्याचा कुठे तरी सन्मान व्हावा म्हणून जयंती उत्सव समिती तर्फे सौ सीमा ओस्तवाल यांना उपस्थित म ान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. या प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षा सौ. मैनाताई बोराडे, उपशिक्षणाधिकारी ( प्रा.) बीड, अरुणाताई आठवले, सुशीलाताई मोराळे, सुमेध जोगदंड, शैलजा चिलवंत, माया चोपडे, माया दिवाण आदींची उपस्थिती होती.






*हवामान विभागाने मराठवाड्यासह मध्य महाराष्ट्रात उष्ण व दमट तापमानाचा अंदाज दिला आहे . मध्य महाराष्ट्र मराठवाडा आणि विदर्भ सध्या भयानक तापला आहे . उन्हाची तीव्रता वाढली आहे. तापमान ४0ओ च्या पुढे गेल्याने नागरिकांनी बाहेर न निघण्याचा पसंत केल्याचे दिसले .परळीतील मुख्य रस्त्यांवर आज शुकशुकाट पाहायला मिळाला.*



*बीड: डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त अभिवादन करताना ॲड. गोविंद शिराळे यांच्या सह वकील बांधव छायाचित्रात दिसत आहेत.*



*बीड : ढेकणमोहा येथे निखील सातपुते यांच्या मोरया ग्राफिक्स चे उद्घाटन श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी चे मठाधिपती महंत नवनाथ बाबा यांच्या हस्ते संपन्न झाले या प्रसंगी शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर अनंत करांडे, शाम काकडे यांच्यासह गावातील सर्व सहकारी मान्यवर उपस्थित होते.*




*बीड : डॉ . इलियास खान बालरोगतज्ञ तथा सी एन एस फिटनेस क्लब संचालक यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना ॲड. गोविंद शिराळे पाटील, इम्रान भाई, असीम भाई.*